



दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता




vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार १ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३५० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# पूजा खेडकर प्रकरणाची धग नाशिकला ! तहसीलदारासह ३३ शिक्षक अडकले!

प्रतिनिधी/सुरेश इंगळे

भारतीय प्रशासन सेवेतील वादग्रस्त पूजा खेडकर प्रकरण अनेकांना भोवण्याची चिन्हे आहेत. या प्रकरणामुळे खडबडून जागे झालेल्या प्रशासनाने दिव्यांग प्रमाणपत्र तपासणीचा धडाका लावला आहे. त्यात तहसीलदार बाळू मरकड हे देखील अडकले आहेत. विविध तक्रारींकरून राज्य सेवा आयोगाने दिव्यांग प्रमाणपत्र असलेले महाराष्ट्र सरकारच्या महसूल शाखेतील तहसीलदार बाळू मरकड यांच्या चौकशीचे आदेश दिले होते. त्यात तहसीलदार मरकड यांचे दिव्यांग प्रमाणपत्र बनावट आढळले आहे. नियमानुसार ४० टक्के अथवा त्याहून अधिक दोष अपेक्षित आहे. तहसीलदार मरकड यांना कर्ण व दृष्टी दोष २० टक्क्यांपेक्षाही कमी आहे. यासंदर्भात शल्य चिकीत्सक डॉ. कपील आहेर यांनी याबाबत चौकशी केली. त्याचा अहवाल त्यांनी वरिष्ठांना पाठविला आहे. त्यामुळे प्रमाणपत्र देणारे डॉक्टर अडचणीत आले आहेत. श्री. मरकड नाशिकबाहेरचे असतानाही डॉ.आहेर यांनी हे प्रमाणपत्र दिले होते. राज्य सेवा आयोगाची देखील यात फसवणूक झाली. यानिमित्ताने पूजा खेडकर प्रकरणाने बनावट प्रमाणपत्र आणि नियुक्तीच्या गैरव्यवहाराच्या सुरस कथा बाहेर पडल्यात. त्यामुळे सबंध प्रशासनच संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. विशेषतः आरोग्य विभागाकडून दिव्यांग प्रमाणपत्र देण्याचे प्रकार उघडकीस येऊ लागले आहेत.



शासनाने सर्वच नियुक्त केलेल्या दिव्यांगांची प्रमाणपत्रे तपासण्यास सुरुवात केली आहे. त्याचा फटका नाशिकच्या ३३ शिक्षकांना देखील बसला आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभाग प्रशासनाने बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांविरोधात आक्रमक पवित्रा घेतला. दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्याचा फटका बसणार आहे. संबंधित विभाग प्रमुखांनी तातडीने ही प्रमाणपत्रे खरी आहेत का? याची तपासणी करावी, असे आदेश जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ अर्जुन गुंडे यांनी दिले होते. या मोहिमेत दिव्यांग म्हणून नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची तपासणी झाली. या तपासणीत ५९ कर्मचाऱ्यांनी शिक्षण विभागात दिव्यांग प्रमाणपत्राची पडताळणी केलेली नव्हती. यामध्ये ३३ शिक्षक आहेत. १० मुख्याध्यापक आणि ४५ शिक्षकेतर कर्मचारी आहेत. याशिवाय अन्य विभागातही असे कर्मचारी असण्याची शक्यता आहे. त्याची माहिती संकलित केली जात आहे. एकंदरच वादग्रस्त भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी पूजा खेडकर हिचे प्रताप देशभर चर्चेत आले. त्याने लोकसेवा आयोगापासून तर आता जिल्हा जिल्ह्यातील शिक्षकांचीही बनावटगिरी उघडकीस आली. पूजा खेडकर प्रकरणाचा इम्पॅक्ट उद्या अगदी गावातल्या आणि ग्रामपंचायतच्या कर्मचाऱ्यांनाही बसला तर नवल नाही.



## जनविकास महाविद्यालयात प्रेमचंद जयंती साजरी

केज/प्रतिनिधी

तालुक्यातील बनसारोळा येथील जनविकास महाविद्यालयात कथासम्राट मुंशी प्रेमचंद यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे हे उपस्थित होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये आपले विचार व्यक्त करताना प्रेमचंद यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.प्रेमचंद यांचा जन्म ३१ जुलै १८८० रोजी बनारसमधील लम्ही या छोट्याशा गावात झाला. प्रेमचंद जी लहान आणि सामान्य कुटुंबातील होते. लहानपणापासूनच त्यांचे जीवन अनेक संघर्षांतून गेले होते. प्रेमचंद जी अवघ्या आठ वर्षांचे असताना त्यांच्या आईचे एका गंभीर आजाराने निधन झाले.अगदी लहान वयातच आईच्या निधनामुळे प्रेमचंद जींना लहानपणापासूनच आई-वडिलांचे प्रेम मिळू शकले नाही.लहानपणापासूनच त्यांना हिंदीबद्दल वेगळी ओढ होती. त्यासाठी त्यांनी स्वत: प्रयत्न सुरू केले आणि एका छोट्या कादंबरीतून सुरुवात केली.त्यांच्या आवडीनुसार ते लघुकादंबऱ्या वाचत असत. वाचनाची ही आवड असल्याने त्यांनी पुस्तकांच्या विक्रेत्याकडे काम करायला सुरुवात केली.त्यामुळे त्यांचा दिवसभर पुस्तक वाचनाचा छंद पूर्ण होत राहिला. असे अध्यक्ष समारंभामध्ये विचार व्यक्त केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ.मुरलीधर लहाडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक कर्मचारी उपस्थित होते उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. गोपाळ भोसले यांनी मानले.

## शंकर कळंबाटे परिवारातर्फे शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व आर्थिक वस्तु वाटप...! आमची शाळा,आमचा अभिमान

गुहागर/प्रतिनिधी

शाळा...! खरं तर प्रत्येक मानवसृष्टीला संकारात्मक दिव्य दृष्टी बहाल करणारं मुक्त विद्यापीठ शाळा.अज्ञानातून ज्ञानाकडे,असत्यातुन सत्याकडे घेऊन जाणारी तेजोमय अशी पायवाटआहे. खेड्यापाड्यात, वाडी वस्त्यांवर , दुरवरच्या पारावर पशुसमान वाजवल्या जाणाऱ्या माणसांना माणसात आणण्याची प्रक्रिया याच शाळा नावाच्या वर्गातुन सुरू झाली. कधी मोडक्या तोडक्या तर कधी पावसाळ्यात छप्पर गळण्याच्या एखाद्या इमारतीत शाळा भरू लागली. अगदी त्यातुनच कित्येकांना जगण्याचे नवे मार्ग सापडले. आपली मुले शिक्षण पासून वंचित राहता कामा नये म्हणून शिक्षण क्रांतीची ज्योत प्रज्वलीत करून जिल्हा परिषद शाळा निर्माण केल्या.प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे हेच ध्येय घेऊन चिपळूण तालुक्यातील मौजे मुर्तवडे येथील जि.प.पुर्ण प्राथमिक शाळा केरे टोक नं.२ व जि.प.पुर्ण प्राथमिक शाळा ढामकोली नं.१ तसेच जि.प.पुर्ण प्राथमिक शाळा मुर्तवडे नं.५ , जि.प.प्राथमिक शाळा ढामकोळी नं.२ आदी शाळेतील



विद्यार्थ्यांना शंकर कळंबाटे परिवारातर्फे शैक्षणिक साहित्याचे व भेटवस्तू वाटप करण्यात आले. यामध्ये शिक्षणासाठी लागणारे साहित्य अर्थात कंपास बॉक्स ,वही ,पेन, पेन्सिल ,डिजिटल वस्तू तसेच आर्थिक स्वरूपात मदत केली. या परिवारातर्फे यथाशक्तीने शक्य झाले तेवढे सहकार्य करण्याचा प्रयत्न केला. भविष्यात ही मुलं स्वबळावरती मोठे बनण्याचा नक्कीच प्रयत्न करतील हेच उद्दिष्ट होतं. नुकताच शनिवार दि.२७ जुलै २०२४ रोजी कार्यक्रम संपन्न झाला.

तो लहान मुलांचा हसरा चेहरा पाहून शंकर कळंबाटे परिवाराला खूप आनंद झाला. विशेष सहकार्य श्री किसन सावंत साहेब, दिनेश कळंबाटे, सचिन राऊत ,जनार्दन कळंबाटे ,नरेश वणगे, आदित्य कळंबाटे, सतिश नावले, बांद्रे साहेब, प्रमोद आगरे, विनायक पाडावे साहेब,प्रतिक्षा शेलार , तृप्ती मांढरे , करिना सातकर यांचे लाभले होते. या कार्यक्रमाला जि.प.पूर्ण प्राथमिक शाळा केरे टोक नं२ मुख्याध्यापक श्री सुधिर उकार्डे ,श्री शिवराम भुवड , श्री गणपत तांबे,सौ राजेश्री केंबले ,अंगणवाडी शिक्षिका सौ धनश्री रांबाडे,सौ निर्मळा पवार, जि.प.पूर्ण प्राथमिक शाळा मुर्तवडे नं५ मुख्याध्यापिका सौ दिक्षा पवार,सौ. निधी खामकर अंगणवाडी शिक्षिका सौ अनुष्का शिगवण ,सरपंच श्रावणी भुवड, शाळेय व्यवस्थापन अध्यक्ष श्री सचिन भुवड,उपाध्यक्ष सौ दिक्षा निर्मळ,सदस्य ममता निर्मळ,पल्लवी निर्मळ, रागिणी निर्मळ ,जि.प.पूर्ण प्राथमिक मराठी शाळा ढाकमोली नं १ मुख्याध्यापिका सौ विनीता विनायक पाद्धे,श्री परशुराम देवरुखकर,श्री संजय सुर्वे, श्री आनंद गुजर, सौ.स्वाती घोरपडे आदी उपस्थित होते. उपस्थित व्यक्तीनी शंकर कळंबाटे परिवाराचे आभार मानले.




### आरक्षण_बचाव_यात्रा

त्या काळात आंबेडकरांनी आरक्षण दिले आणि या काळात ते आरक्षण टिकवण्यासाठी परत आंबेडकरचं रस्त्यावर उतरले आहेत. आपलीही जिम्मेदारी आहे त्यांच्या खांद्याला खांदा लावून या व्यवस्थेविरुद्ध लढण्याची म्हणून SC ST OBC आरक्षण धारक सर्वांनी आरक्षण बचाव यात्रेला सहभागी होऊन व्यवस्थेला दाखवून द्या आम्ही अजून जागे आहोत..!
माजलगाव दौरा दि 01/08/2024 ठीक 12:00 वा
हक्क वाचवण्यासाठी बहुसंख्येने सहभागी व्हा! असे आव्हानं करण्यात येतं आहे.
आपले नम्र
डॉ संजय नाकलगाकर
तालुकाध्यक्ष: मजलगाव

## केज तालुक्यात मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा






## शिवाजी दादा ठोंबरे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे तर वृद्धाश्रमात फळे वाटप

केज/सचिन भालेराव

मराठा आरक्षणाची खंबीर भूमिका घेत अखेरच्या श्वासापर्यंत मराठा समाजासाठी आणि आरक्षणासाठी लढत राहणारे क्रांतीसुर्य मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस छावा मराठा संघटनेचे जिल्हाप्रमुख शिवाजी दादा ठोंबरे यांच्या वतीने विविध उपक्रम घेऊन साजरा करण्यात आला.

माझ्या समाजाला हक्काचं आरक्षण मिळावे यासाठी आपल्या प्राणाची बाजी लावून समाजासाठी आपले जीवन समर्पित करणारे मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त केज तालुक्यातील मौजे उंदरी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.त्याच बरोबर बोबडेवाडी येथील श्री. स्वामी समर्थ वृद्धाश्रमात फळे वाटप करत मदत रूपाने वाढदिवस साजरा करण्यात आला.

यावेळी छावा जिल्हाप्रमुख शिवाजी दादा ठोंबरे,यांचेसह कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रविण खोडसे व अनंत शिंदे,शाळेचे मुख्याध्यापक गायकवाड सर, चव्हाण सर, प्रमोद ठोंबरे, लक्ष्मीकांत ठोंबरे,सखाराम गरडे,लक्ष्मण हंकारे, दिनेश ठोंबरे, बाळासाहेब ठोंबरे, अनंत महाराज, अशोक ठोके, महेश पतंगे, खबर ठोंबरे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# केज विधानसभेसाठी संदीपान (तात्या) हजारे यांना उमेदवारी देण्यात यावी कार्यकर्त्यांची मागणी



**केज/सचिन भालेराव**

नुकतीच लोकसभा निवडणूक पार पडली. आणि आता विधानसभेची पुर्वतयारी जोरात सुरु झाली आहे. तसा केज मतदार संघ हा राखीव मतदार संघ असल्याने या मतदार संघातील अनेक जण निवडणूक लढविण्यासाठी इच्छूक असल्याचे आज पहावयास मिळत आहे. त्यातच ज्यांनी आपले संपुर्ण आयुष्य समाजासाठी समाजातील जनतेच्या अडीअडचणी आणि प्रश्न सोडविण्यासाठी घालवले मात्र त्यांनी कधीच आपले स्वहित पाहीले नाही.असे केज शहराचे रहिवाशी आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे जिल्हा कार्याध्यक्ष, निष्ठावंत जेष्ठ नेते आदरणीय संदीपान तात्या हजारे यांना विधानसभा २०२४ या केज मतदार संघातून विधानसभेच्या निवडणुकीसाठी मा.खा.रामदासजी आठवले यांनी उमेदवारी देऊन एका जुन्या पँथरला न्याय द्यावा अशी मागणी केज येथे झालेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत करण्यात आली आहे. सविस्तर माहिती अशी कीज् लोकसभेच्या निवडणुकी नंतर आता तयारी सुरू झाली आहे. ती म्हणजे विधानसभेची गेल्या अनेक वर्षांपासून केज मतदार संघ हा राखीव मतदार संघ राहिला परंतु या मतदार संघात बौध्द समाजाच्या उमेद्वाराला कधीच न्याय मिळाला नाही.तशी केज मतदार संघात बौध्द मतदारांची संख्या जास्त आहे. परंतु या समाजाला या राजकीय वर्तुळात कधीच येवु दिले गेले नाही. दलित पँथरच्या काळापासून दलित बांधवांवर होणारे अन्याय अत्याचाराच्या विरोधात सर्व ताकतीने उभे राहाणारे आणि पुढे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचे सर्वेसर्वा संस्थापक अध्यक्ष मा.खा.रामदाजजी आठवले यांच्या सोबत राहुन एकनिष्ठेने पक्षाची जबाबदारी खांद्यावर घेऊन ती समर्थपणे पेलुन आजतागायत ते पक्षाचे काम करत आहेत.ते नाव म्हणजे केज शहराचे रहिवाशी मा.संदिपान तात्या हजारे हे होय.ते आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी काम करत आहेत. खा.आठवले साहेब गेल्या कित्येक वर्षांपासून सत्तेत राहिले. परंतु संदीपान तात्या हजारे यांनी कधीच आपला स्वार्थ आणि स्वहित पाहीले नाही. ते आत्तापर्यंत लढले ते फक्त आणि फक्त समाजासाठी समाजाच्या प्रश्नांसाठी.. त्यामुळे यावेळी तरी या निस्वार्थी नेत्याला केज मतदार संघाच्या विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाचे अध्यक्ष सर्वेसर्वा मा.खा.रामदास आठवले यांनी उमेदवारी देऊन या मतदार संघाला एक नवा चेहरा द्यावा.अशी मागणी केज येथे नुकत्याच झालेल्या बैठकीत कार्यकर्त्यांनी केली आहे. यामध्ये प्रामुख्याने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या मराठा आघाडीचे जिल्हाध्यक्ष मा.नवनाथजी तपसे, रिपाई केज तालुकाध्यक्ष मा.सुनील हिरवे, ता.उपाध्यक्ष व्यंकट हजारे, ता.कार्याध्यक्ष मा.ईश्वर (भाऊ) सोनवणे,ता. कोषाध्यक्ष अंगद शिनगारे, यांचेसह बाळासाहेब ओव्हाळ, अमोल मस्के यांचेसह अनेक कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते.तर या बैठकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या मराठा आघाडीच्या केज तालुका अध्यक्षपदी मा.सुग्रीव (भाऊ) बसवर यांची नियुक्ती पत्र देवुन सर्वानुमते निवड करण्यात आली..

## जिल्हा परिषद शाळा टोकावडे येथे शैक्षणिक साहित्य वाटप



**मुरबाड तालुका प्रतिनिधी**

मुरबाड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा टोकावडे येथे शांता नारायण चॅरिटेबल ट्रस्ट व सामाजिक कार्यकर्ते महेश भांगे यांच्या पुढाकाराने शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले ,यामध्ये विद्यार्थ्यांना पेन पेन्सिल, वह्या, स्कूल बॅग यांचे वाटप करण्यात आले या वेळी शांता नारायण संस्थेच्या अध्यक्ष कांचन शिंदे मॅडम यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, शैक्षणिक प्रगती व्हावी या उद्देशाने संस्था अशा सेवा भावी उपक्रम राबवीत असल्याचे सांगितले ,मुलांशी हितगुज करून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची उजळणी घेतली या वेळी संस्थेच्या अध्यक्ष कांचन शिंदे मॅडम, शशांक सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते महेश भांगे, भवनजी कांबळे, आश्विनी हिवाळे, संदीप पवार, गणेश पवार ,शाळेचे मुख्याध्यापक संभाजी पवार, इतर सहशिक्षक मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते शाळेचे मुख्याध्यापक पवार सर यांनी शांता नारायण चॅरिटेबल ट्रस्ट व सामाजिक कार्यकर्ते महेश भांगे यांचे आभार मानले ....

## रांजणी बस स्टॅण्ड भागात रस्त्याची दयनीय अवस्था, विद्यार्थ्यांना चिखल तुडवीत गाठावी लागते शाळा

**जालना/असलम कुरेशी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी बस स्टॅण्ड भागात विरेगांव-कुं. पिंपळगांव रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून या मार्गावरून मार्गक्रमण करताना नागरिकांसह विद्यार्थ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे रांजणी येथे शिक्षणासाठी येणाऱ्या हजारों विद्यार्थ्यांना अक्षरशः चिखल तुडवीत शाळा गाठावी लागत आहे. रांजणी बस स्टॅण्डवर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले असून या रस्त्यावरून पायी चालणाऱ्या नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. रांजणी येथील बस स्टॅण्ड भागात पावसाचे पाणी रस्त्यावर साचत असल्याने रस्त्यांना तलावाचे स्वरूप आले आहे. या भागातील रस्त्यावर पाणी व चिखल साचल्याने पायी चालणाऱ्या नागरिकांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. रांजणी श्री सरस्वती भुवन प्रशालेत शिक्षण घेण्यासाठी परिसरातील 22 गावातील तब्बल 2 हजार विद्यार्थी याच मार्गाने शाळेत येतात. सध्या रिमझिम पाऊस सुरु असल्याने रांजणी बस स्टॅण्डवर सर्वत्र चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना अक्षरशः चिखल तुडवीत शाळा गाठावी लागत आहे. या भागातील नागरिक अनेक वर्षापासून रस्त्यांची मागणी करत होते. विशेष म्हणजे विरेगांव-राजाटाकळी मार्गाच्या कामाला मंजुरी मिळालेली आहे. परंतु मांजर कुठे आडवी गेली आणि या मार्गाचे काम नेमके कधी सुरु होईल हेच



समजत नाही. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यावर साचणाऱ्या पाण्याचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे. तसेच विरेगांव-राजाटाकळी मार्गाचे काम तात्काळ सुरु करण्याची मागणी श्री सरस्वती भुवन प्रशालेचे शालेय समितीचे अध्यक्ष गौतमभाऊ देशमुख यांनी केली आहे.

## ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलना निमित्त २४ ऑगस्ट रोजी कथा लेखन कार्यशाळेचे आयोजन
## दत्ता पाटील यांच्या हस्ते उद्घाटन तर प्रा. कमलाकर कांबळे, प्रा. आसाराम लोमटे यांचे मार्गदर्शन

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

मराठवाडा साहित्य परिषद शाखा अंबाजोगाईच्या वतीने आयोजित ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलना निमित्त २४ ऑगस्ट २०२४ रोजी कथाकथन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून या कार्यशाळेचे उद्घाटन दत्तात्रय (आबा )पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार असून या कार्यशाळेस ज्येष्ठ साहित्यिक पत्रकार आसाराम लोमटे (परभणी) व ज्येष्ठ लेखक तथा सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे हे मार्गदर्शन करणार असल्याची माहिती साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार व संयोजक डॉ. राहुल धाकडे यांनी दिली आहे. या संदर्भात अधिक माहिती देताना स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार आणि संयोजक डॉ.राहुल धाकडे यांनी पुढे असे म्हटले आहे की, मराठवाडा साहित्य परिषद शाखा अंबाजोगाईच्या वतीने डिसेंबर महिन्यामध्ये आयोजित करण्यात आलेल्या ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलन निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या मधील “कथा लेखन कार्यशाळा” हा पहिला उपक्रम दि.२४ ऑगस्ट २०२४ रोजी येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या सभागृहात घेण्यात येणार आहे.

ही कथा लेखन कार्यशाळा तीन सत्रात आयोजित करण्यात आली असून पहिले सत्र उद्घाटनाचे असेल. हे सत्र सकाळी १० वाजता सुरू होणार आहे. या सत्रात उद्घाटक म्हणून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या स्थानिक नियोजन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय (आबा) पाटील हे राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवदास सिरसाठ हे राहणार आहेत. यावेळी व्यासपीठावर स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार व मसापचे अध्यक्ष दगडू लोमटे यांची उपस्थिती राहील.

दुसरे सत्र उद्घाटनीय कार्यक्रमानंतर लगेचच सुरु करण्यात येणार असून या सत्रात “कथा लेखनाचे तंत्र” या विषयावर ज्येष्ठ लेखक तथा सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे हे मार्गदर्शन करणार आहेत.

दुसऱ्या सत्रानंतर महाविद्यालयाच्या परिसरातच अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली असून अल्पोपहारा नंतर तिसरे सत्र सुरू होईल. या सत्रात “माझ्या कथांची जन्मकथा व प्रश्नोत्तरे” या विषयावर ज्येष्ठ लेखक तथा पत्रकार प्रा. आसाराम लोमटे हे मार्गदर्शन करणार आहेत.

# आरोपीला कठोरात कठोर शिक्षा होईल यासाठी प्रयत्न करणार-रुपालीताई चाकणकर

**उरण/विठ्ठल ममताबादे**

यशश्री शिंदे या उरण मधील तरुणीची एका नराधमाने अत्याचार करून क्रूरपणे हत्या केली. या निर्घृण खुणामुळे संपूर्ण महाराष्ट्रात हळहळ पसरली होती. अत्याचार करणाऱ्या व यशश्री शिंदेच्या मारेकऱ्याला कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी सर्वच राजकीय पक्ष व विविध संघटना व संस्थांनी उरण पोलीस स्टेशन वर मोर्चा देखील काढला होता. या प्रकरणा मुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले होते. या गंभीर समस्येची दखल महाराष्ट्र शासनाने घेतली असून महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपालीताई चाकणकर यांनी यशश्री शिंदेच्या घरी जाऊन तिच्या आई-वडील व नातेवाईकांची भेट घेतली.व त्यांचे सांत्वन केले.यावेळी यशश्रीच्या आई-वडिलांनी यशश्री सोबत घडलेली सर्व हकीकत सांगितली व यशश्रीला न्याय देण्याची विनंती केली. यावेळी उपस्थित महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपालीताई चाकणकर यांनी सदर दोषीवर कठोरात कठोर कारवाई करण्याचे आश्वासन यशश्रीच्या आई वडिलांना दिले. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अजित पवार गटाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष नामदेव भगत,उरण तालुकाध्यक्ष परीक्षित ठाकूर,युवा अध्यक्ष समद बोंबले,अमित साहू,संदेश म्हात्रे,दिनेश पाटील, महिला पदाधिकारी शोभा चौगुले, देवकी शिंदे, साधना वाणी, केदारे मॅडम आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. या सर्व पदाधिकाऱ्यांनी यशस्वी शिंदेच्या कुटुंबीयांची भेट घेउन त्यांचे सांत्वन केले. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना रूपालीताई चाकणकर



म्हणाल्या की ‘आरोपीला जात-पात धर्म पक्ष काहीही नसतो.ती एक विकृती आहे.कोणीही जातीपातीचे राजकारण करू नये.दिवसेंदिवस समाजात अशा विकृती वाढत चालले असून अशा विकृतीचा वेळीच बंदोबस्त झाला पाहिजे. समाजात वाईट कृत्य, वाईट गोष्टी घडू नये यासाठी आता सर्वांनीच पुढाकार घ्यायला पाहिजे. राज्यात महिलांवरील अत्याचार थांबावेत यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. पोलीस प्रशासन त्याचे काम योग्यरीत्या करीत आहेत.यशश्री शिंदे प्रकरणातील आरोपीवर कठोरात कठोर कारवाई केली जाईल यासाठी मी जातीने लक्ष घालेन’ असे रुपालीताई चाकणकर यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले.याप्रसंगी उपस्थित उरण तालुका अध्यक्ष परीक्षित ठाकूर यांनी सदर प्रकरणातील आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी व यशश्री शिंदेला न्याय मिळवून द्यावा अशी मागणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर व प्रशासनाकडे केली आहे.

# प्रा.ईश्वर मुंडे माजलगाव विधान सभा निवडणूक लढवणार प्रदेशाध्यक्षांकडे केली तिकिटाची मागणी

**बीड/प्रतिनिधी**
विधान सभा निवडणूक २०२४ साठी सर्वच पक्षांनी जोरदार मोर्चे बांधणी सुरू केलेली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस- शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारांची चाचपणी करण्यासाठी निष्ठावंतांशी संवाद म्हणून प्रदेशाध्यक्ष आ.जयंतराव पाटील हे राज्यभर दौरा करत आहेत.

दि.२७/७/२०२४ शनिवार रोजी राष्ट्रवादी भवन बीड येथे निष्ठावंत मेळावा व मतदार संघ निहाय उमेदवारांची चाचपणी केली.

बीड लोकसभा निवडणूकीसाठी जिल्हाभर फिरून जनतेच्या पसंतीला उतरलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांची उमेदवारी थोडक्यात हुकली होती.

जिल्हा परिषद बीड अंतर्गत प्राथमिक शिक्षक,विषयतज्ज्ञ ते शिक्षण विस्तार अधिकारी पदावर सेवा करून खा.शरदचंद्र पवार यांना भेटून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेतलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात तालुकाध्यक्ष,प्रदेश सरचिटणीस पदावर चांगले काम केलेले आहे.

सध्या राष्ट्रवादी कॉंग्रेस- शरदचंद्र पवार पक्षात सेवा निवृत्त अधिकारी-कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख असलेल्या प्रा. ईश्वर आनंदराव मुंडे यांनी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या कडे माजलगाव विधान सभा निवडणूक २०२४ साठी उमेदवारी




मागितली आहे.

या वेळी मंचावर खा.बजरंग बप्पा सोनवणे,जिल्हाध्यक्ष आ.संदिप भैया क्षीरसागर,पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे,युवक प्रदेशाध्यक्ष महाबुब भाई शेख,माजी आ.सौ. उषाताई दराडे,युवती प्रदेशाध्यक्षा सक्षणाताई सलगर, किसान सेल प्रदेशाध्यक्ष कु.पुजा मोरे,सुशिलाताई मोराळे व पक्षाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते बहू संख्येने उपस्थीत होते.

माजलगाव मतदार संघाचे सामाजिक समीकरण पहाता खा.शरदचंद्र पवार यांनी उच्च शिक्षित व सर्व समाजमान्य प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांना इंडीया आघाडीची उमेदवारी दिली जनतेला तगडी फाईट पहायला मिळेल.

# लायन्स क्लब मार्फत मोरा शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे मोफत वाटप.

**उरण/विठ्ठल ममताबादे**
लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३१ए४ यांच्याकडून जे.एम. म्हात्रे प्राथमिक व माध्यमिक शाळा,मोरा - उरण या शाळेतील बालवाडी, पहिली ते चौथी व पाचवी ते दहावी अशा गरीब गरजू विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षी लायन्स क्लब 'भुका न रहे कोई ' या ग्रुप तर्फे शाळेतील गरीब गरजू विद्यार्थ्यांना २५० गणवेशाचे वाटप करण्यात आले.

लायन्स क्लब ग्रुपचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन एस. आर.परमेश्वर, लायन धरवानी, लायन विजय गनात्रा, लायन मिलिंद पाटील, लायन रमाकांत म्हात्रे, लायन दत्तात्रेय कोळी, लायन सागर चौरकर, मोनिका डावरे, सीमा घरत , लायन क्लबचे सर्व सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले.



या गणवेशांचे वाटप करण्यासाठी लायन्स क्लबचे सर्व पदाधिकारी स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करून गणवेशाचे वाटप केले.

प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक साईनाथ गावंड यांनी आपल्या मनोगतातून म्हटले की या शाळेमध्ये आज गरीब गरजू विद्यार्थी मोफत शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी म्हणून वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम राबवले जातात. त्यापैकीच एक उपक्रम म्हणजे गणवेश वाटप होय. गणवेश वाटप केल्यामुळे लायन क्लबचे शाळेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक सुधीर मुंबईकर यांनी आपल्या मनोगतातून शालेय प्रगती संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून गणवेश देणाऱ्या लायन क्लबचे आभार व्यक्त केले.

या प्रसंगी लायन ग्रुपचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन एस आर परमेश्वर, लायन मिलिंद पाटील, लायन रमाकांत म्हात्रे, माध्यमिक शाळेचे चेअरमन पी. एम. कोळी, प्राथमिक शाळेचे चेअरमन चंद्रकांत कोळी,प्रभारी मुख्याध्यापक साईनाथ गावंड, सहाय्यक शिक्षक सुगिंद्र म्हात्रे, अनिल पाटील, स्वप्निल नागमोती, शिंदे मॅडम, घरत मॅडम, सुनीता पाटील , राणी कदम, सुप्रिया मुंबईकर , माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक सुधिर मुंबईकर, रुपाली चौधरी, कोल्हे मॅडम, शिक्षक, विद्यार्थी व पालक वर्ग उपस्थित होते.

कार्यक्रमाची सजावट घनश्याम म्हात्रे व दिनेश पाटील यांनी केली. सूत्रसंचालन मनोज म्हात्रे यांनी केले.आभार सहाय्यक शिक्षक अनिल पाटील यांनी करून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

# मंगळवेढा एसटी आगार नफ्यात



**सोलापूर/विश्वास चोपडे**
माहे जून २०२४ या महिन्यात मंगळवेढा आगारास१४ लाख ४० हजार इतका नफा झाला आहे. पुणे प्रदेशातील एकूण ५६आगारांपैकी फक्त पाच आगार जून महिन्यात नफ्यात असून यापैकी तीन आगार हे सोलापूर विभागातील आहेत यामध्ये मंगळवेढा आगाराचा समावेश असल्याने मंगळवेढा आगारातील कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.सोलापूर विभागाचे विभाग नियंत्रक श्री विनोदकुमार भालेराव साहेब व विभागीय वाहतूक अधिकारी श्री अजय पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनामुळेच व मंगळवेढा आगारातील चालक-वाहक, यांत्रिक कर्मचारी ,पर्यवेक्षकीय कर्मचारी यांनी सामूहिक प्रयत्न केल्याने मंगळवेढा आगारास नफा झाल्याचे आगार व्यवस्थापक संजय भोसले यांनी सांगितले.

# चौसाळा शहरात विस्तार होऊन वाढलेल्या घरांची नोंद सिटी सर्व्हेला घ्या-पवन कुचेकर

**बीड /प्रतिनिधी**
बीड तालुक्यातील चौसाळा येथिल गावठाण मध्ये असणारया जागेची नोंद ही सिटीसर्वे मध्ये नसल्याने येथिल नागरिकांची शासकिय कामे खोळबंली असुन राहत्या जागेवर गृह कर्ज अशी काही प्रकरणे होत नाहीत. अशी कर्जे प्रकरणे करावयाची असल्यास त्यांना सिटी सर्व्हे पी आर कार्डची आवश्यकता भासते तसेच मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज व अन्य काही कर्जासाठी सिटी सर्व्हे ची नोंद नसल्याने हेळसांड होत आहे. १९७० ते १९७२ च्या दरम्यान ही सिटी सर्व्हे नोंद घेण्यात आली होती पुढील काळात ही नोंद घेण्यात आली नाही करीता विस्ताराने वाढलेल्या चौसाळा शहरातील जागेची नोंद ही सिटीसर्वे ला घेण्याबाबत भाजपा अनुसुचित जाती मोर्चाच्या माध्यमातुन बीड जिल्हा अधिकारी यांना निवेदन देऊन या प्रकरणी योग्य तो पाठपुरावा करून शक्यतो सिटीसर्व्हे कार्यालय चौसाळा या ठिकाणी उपलब्ध करून घेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रसिध्दी पत्र भाजपा अनुसुचित जाती मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर यांनी दिले आहे.

# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिवसेना सदस्य नोंदणी अभियानाला केज मधुन शिवसेना उपनेत्या प्रा.सुषमाताई अंधारे यांच्या हस्ते प्रारंभ

**केज/प्रतिनिधी**
शिवसेना पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे, युवासेनाप्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब यांच्या




आदेशानुसार शिवसेना नेते सुनीलजी प्रभु साहेब, मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथ नेरूरकर,शिवसेना संपर्कप्रमुख बीड परशुराम जाधव साहेब, सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना उपनेत्या सुषमा ताई अंधारे,बीड लोकसभाप्रमुख सुनिल धांडे सर, यांच्या उपस्थितीत व शिवसेना बीड जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या आयोजनात आज शिवसेना मध्यवर्ती संपर्क कार्यालय केज येथे शिवसेना प्राथमिक सदस्य नोंदणी अभियानाला प्रारंभ करण्यात आला..! या सदस्य नोंदणी अभियानात शिवसेना उपनेत्या सुषमा ताई अंधारे यांनी प्रथम सदस्यत्व नोंदवून अभियानाला सुरुवात केली, पदाधिकार्यांना व शिवसैनिकांना या सदस्य नोंदणी अभियानाविषयी मार्गदर्शन केले, यावेळी बीड शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांनी केज विधानसभा व परळी विधानसभा मतदारसंघातून जास्तीत जास्त सदस्य नोंदणी कराव्यात अशा सुचना केल्या. यावेळी शिवसेना उपनेत्या सुषमा ताई अंधारे, बीड लोकसभाप्रमुख सुनिल धांडे सर, बीड शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे,केज विधानसभा नेत्या डॉ.नयनाताई सिरसाठ, उपजिल्हाप्रमुख दिपक मोराळे, उपजिल्हाप्रमुख शिवाजी कुलकर्णी, उपजिल्हाप्रमुख नारायण सातपुते, तालुकाप्रमुख केज अशोक जाधव, अंबाजोगाई तालुकाप्रमुख बालासाहेब शेप, परळी तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल, अंबाजोगाई शहरप्रमुख अशोक हेडे,केज शहरप्रमुख तात्या रोडे किशोर घूले सह शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# जुन्या आठवर्णींना उजाळा देत जिल्हा परिषद हायस्कूल केज१९८६ च्या दहावी बॅचने लोणावळा येथे मोठ्या उत्साहात ३रे गेट-टुगेदर संपन्न.

**केज/ सचिन भालेराव**
एके काळी बीड जिल्ह्यात नावा-रूपास असलेली जिल्हा परिषद हायस्कूल केज येथील १९८६ दहावी च्या वर्गाच्या माजी विद्यार्थी -विद्यार्थिनी यांनी दिनांक २७ व२८ जुलै रोजी मोठ्या उत्साहात आनंदात गेट-टुगेदर साजरे केले, वास्तविक पाहता दहावीनंतर एकत्र येणे व आपापले सुखदुःख आपल्या बाल मित्रांना सांगणे यात खूप आनंद आहे. त्यावेळच्या दहावी वर्गातील विद्यार्थी प्रवीण देशपांडे यांच्या संकल्पनेतून एक व्हाट्सअप ग्रुप तयार करण्यात आला यामध्ये दहावी वर्गातील विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याचे काम केले. जस जसे व्हाट्सअप ग्रुप मध्ये संख्या वाढू लागली . तस तसे नवनवीन जुने मित्र ग्रुप मध्ये ॲड झाले नंतर सर्वानुमते कानडी माळी येथे रामकिशन राऊत यांच्या शेतात उत्साहाने पहिले गेट-टुगेदर संपन्न झाले यावेळी त्यांच्या वर्ग शिक्षकांना आमंत्रीण करण्यात आले नंतर. शिक्षकाच्या जुन्या आठवणींना उजाळा देत पहिले गेट-टुगेदर पार पाडले. ग्रुप सभासद संख्या वाढत गेली. नंतर दुसरे गेट-टुगेदर वर्गमित्र राजू पांगळ यांच्या फार्म हाऊस वर कुर्डूवाडी येथे आनंदात पार पडले. नंतर वेगळे काहीतरी करावे म्हणून तिसरे गेट-टुगेदर लोणावळा येथे करायचे ठरवले. लोणावळा येथे चार बंगले घेऊन या ठिकाणी विविध ठिकाणाहून आलेले वर्गमित्र एकत्र जमले यामध्ये प्राध्यापक, प्रोफेसर, सध्या मोठ मोठ्या हुद्द्यावर असणारे मित्र, व्यवसायिक, शिक्षक हे सर्व स्वतःला विसरून फक्त आपण विद्यार्थी



आहोत असे या गेट-टुगेदर कडे पाहत होते कोणताही मनात भेदभाव नव्हता. संगीताच्या मैफिलीत, गाण्याच्या सुरेल आवाजात, नृत्य करत विविध पदार्थाचा आस्वाद घेत पिकनिक पॉईंट पाहिले. दुसऱ्या दिवशी लोणावळा येथील नारायणी धाम, स्वामी समर्थ मंदिर, एकवीरा देवी, आळंदी करत केज येथे समारोप केला . लोणावळा गेट-टुगेदर ला मनीषा आनंदगावकर, श्री व सौ.राजेश पांगाळ, श्री व सौ.प्रविण देशपांडे, सरोज इंगळे श्री व सौ धनंजय धाट,श्री व सौ.राजेंद्र शिंदे ,श्री व सौ.महादेव दळवे श्री व सौ.देवा पेंढारे, श्री व सौ गोविंद जाजू, मीना जाजू व जिजाजी, मंजुषा डोंगरे, वंदना डोंगरे,पांडुरंग पारेकर अरुणा बहिर,शोभा अंधारे श्री व सौ.जगदीश लहूरीकर श्री व सौ.जगन्नाथ मस्के श्रीवसौ.सुहासघाटश्रीवसौ.दिनकरनाईकवाडे श्री व सौ.रामकिसन राऊत, शालन चौभारकर,दत्ता चाटे श्री व सौ.दिलीप साखरे, श्री व सौ.धनराज अंधारे श्री व सौ राजाभाऊ काळेगोरे श्री व सौ.मेनकुदळे धनंजय, अनिल कवटेकर, श्री व सौ.मनोज दरक श्री व सौ.दिनकर चाटे इत्यादी उपस्थित होते. मैत्री दिनाच्या पूर्वसंध्येला पार पडलेल्या गेट टुगेदर कार्यक्रम यशस्वी करण्यास राजेश पांगांळ यांच्या अथक परिश्रमातून व प्रवीण देशपांडे, मनीषा आनंदगावकर यांच्या उत्कृष्ट नियोजनाखाली, सर्व मित्र मैत्रिणीच्या सहकार्याने हे गेट-टुगेदर अतिशय उस्हात व खेळीमेळ्याच्या वातावरणात पार पडले.

# प्रा.कुडके यांनी विद्यार्थी घडवण्याबरोबरच उभेही केले सेवापुर्ती सोहळ्यात शिक्षण क्षेत्राबरोबरच सामाजिक मंथन

**बीड । वार्ताहर**
शहिद भगतसिंग विद्यालयातील प्राध्यापक शिवमुर्ती कुडके यांनी आपल्या 29 वर्षाच्या कार्यकाळामध्ये विद्यालयात केवळ विद्यार्थीच घडवले नाही तर अनेक गोरगरिब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करत उभे करण्याचे कामही केले. शिक्षक असतांनाही समाजभान ठेवून समाजामध्ये विविध उपक्रम राबवत त्यांनी शेतीसारखा प्रयोग यशस्वी करत बालाघाटच्या डोंगरात आगळावेगळा प्रयोगही यशस्वी केला. त्यामुळे निवृत्तीनंतरही त्यांना सातत्याने सक्रिय राहून समाजसेवा करण्याचे व्रत स्विकारावे लागेल. त्यांच्यासारखा शिक्षक संस्थेला पुन्हा मिळणार नाही असे गौरवोद्गार संस्थेच्या अध्यक्षा प्रा.सुशिला मोराळे यांनी काढले. शिवमुर्ती कुडके यांच्या एकंदरीत कार्यकाळाविषयी आणि शिक्षक सेवेविषयी आ.विक्रम काळे, माजीमंत्री सुरेश नवले, माजी आ.राजेंद्र जगताप, भाशिप्रचे प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह आदी मान्यवरांनी कौतूक करत त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रा.सुशिला मोराळे यांनी आपल्या भाषणामध्ये शिवमुर्ती कुडके यांना मी बोलावून घेत नौकरी दिल्याचे सांगत असतांनाच अत्यंत हुशार आणि क्रियाशील चळवळीचा कार्यकर्ता म्हणून मी शिवमुर्तीला ओळखत होते. त्याचे राजकीय विचार काय आहेत. याकडे मी पाहिले नाही. केवळ त्याचा सांघीक आणि क्रियाशीलता



हा गुण विद्यार्थ्यांसाठी महत्वाचा आहे यामुळेच त्याला संस्थेवर घेतले. त्यांनी देखील आपल्या सेवाकार्यकाळामध्ये संस्थेची प्रामाणिक सेवा केली. अनेक विद्यार्थी घडवले. त्यामुळे संस्थेलाही नावलौकीक मिळण्यास मदत झाली असे त्या म्हणाल्या. शिवमुर्ती कुडके यांच्याविषयी बोलतांना आ.विक्रम काळे यांनी कुडके यांची एक विनिंग आता यशस्वीरित्या संपली आहे. खऱ्या अर्थाने आता ते समाजसेवेमध्ये सक्रिय राहून काही तरी चांगले काम उभा करतील. शेतीमध्ये त्यांचे वेगवेगळे प्रयोग चालूच आहेत. त्यामुळे शेती आणखी बहरेल असा विश्वास व्यक्त केला. प्रा.सुरेश नवले यांनी कुडके यांच्याविषयी ग्रामीण भागातून आलेला विद्यार्थी शिक्षण घेवून परिपुर्ण कसा होईल यासाठी त्यांनी केलेले प्रयोग नक्कीच महत्वाचे आहेत. शिक्षण क्षेत्रामध्ये शिक्षक हा कधीही संपत नाही. बाकी क्षेत्रात लोक विसरतात पण शिक्षकांना लोक विसरत नाहीत. कुडके यांनी चांगली पिढी घडणवण्याचे पवित्र्य कार्य केल्याचे सांगितले. माजी आ.राजेंद्र जगताप यांनी देखील थेट त्यांच्या कुटुंबाद्दलच माहिती देत कुडकेंचे घरच क्रियाशील आहेत. त्यांच्या वडिलांविषयी बोलतांना त्यांनी ते एक चांगले कुस्तीपटू होते. प्रा. शिवमुर्ती कुडके यांनी आपली नौकरी सांभाळून घर आणि शेतीही सांभाळली. समाधानी कुटूंब म्हणून त्यांनी आपला संसार उभा केला. त्यातच त्यांचे मोठे यश असल्याचे जगताप यांनी सांगितले. या कार्यक्रमातच या सर्व वक्त्यांनी विद्यमान शिक्षण परिस्थिती, शिक्षकांची आवस्था, विद्यार्थ्यांची परिस्थिती आणि सामाजिक परिस्थिती याबद्दल विश्लेषात्मक आपली मते मांडली. त्यातून एक चांगले मंथनही झाले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. सौ.खोसे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. गाडेकर यांनी केले. कार्यक्रमास शिक्षण क्षेत्रातील मान्यवर,मुख्याध्यापक, पत्रकार, कुडके यांचे कुटुंबिय, नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वृक्षवल्ली आम्हा सोयरे...नारायण गडावर मिळणार सावलीसह फळे: नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज, विश्वस्त बळीराम गवतेंच्या हस्ते १०० चिंचाची लागवड

**(बीड-प्रतिनिधी)-**
बीड: धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नगद नारायण गडाला मोठी परिसर असून याठिकाणी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे...' हा ध्यास घेवून वृक्षारोपणाचे कार्य मागील काही वर्षांपासून सुरू आहे. याठिकाणी सावलीसही फळे देणाऱ्या वृक्षांना प्राधान्य दिले जात असून आजवर आंबा, नारळ, जांभळ, सिताफळची लागवड केलेली आहे तर दि.३१ जुलै १०० चिंचाच्या रोपांचे रोपण गडाचे महंत शिवाजी महाराज आणि विश्वस्त बळीराम गवते यांच्या हस्ते करण्यात आले. श्री.क्षेत्र नगद नारायण गडावर संस्थांनची शेकडो हेक्टर जमीन आहे. गड डोंगरावर असल्याने त्याठिकाणी पुर्वीपासून खुरटी झाडे आहेत. यामुळे गडावर येणाऱ्या भाविकांना सावली मिळत नाही. याचीच दखल घेत मागिल काही वर्षांपासून महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गडावर येणाऱ्या चारही रस्त्यांच्या बाजुने वृक्षारोपण करण्यात येत आहे. सुरूवातीच्या काळात वडाची झाडे लावण्यात आलेली असून आता ती मोठी झालेली आहे. परंतु वडापासून सावली मिळते, परंतु गडावर येणाऱ्या भक्तांना प्रसादरूपी फळे मिळावेत, यासाठी जवळपास



पाच एकरात आंबा लावण्यात आलेला आहे तर पाच एकरात सिताफळ लावली आहे. शिवाय जिथे यात्रा भरते त्या परिसरात जांभळ लावण्यात आलेली आहे. आता रस्त्यांच्या कडेने चिंच लागवड करण्यात येत आहे. दि.३१ जुलै रोजी कोळगाव (ह) ता.बीड येथील संतकृपा नर्सरीने गडासाठी सात फुट उंचीच्या १०० चिंचाची रोपे गडावर पाठवली. नर्सरीचे मालक गंगाराम महाराज यांनी ही सेवा केली असून महंत शिवाजी महाराज, विश्वस्त बळीराम गवते यांच्या हस्ते या चिंचाचे रोपण करण्यात आले यावेळी नवनाथ काशिद,पंकज कारंडे, जालिंदर शिंदे. व भक्त गण. भक्तांकडून लोखंडी जाळ्या श्री.क्षेत्र नगद नारायण गडावर हिरवळ व्हावी, या गडावर येणाऱ्या भक्तांना सावली मिळावी, यासाठी मागील तीन वर्षापुर्वी भाविकांनी लावलेली झाडे जनावरांपासून वाचावेत, यासाठी लोखंडी जाळ्या दिल्या होत्या. सदरील जाळ्या जिल्हाधिकारी, स्व.विनायक मेटे यांच्या हस्ते झाडांना लावण्यात आल्या होत्या. धाकटी पंढरी श्री.नगद नारायण गड येथील डोंगरावर सामाजिक भान ठेवून भक्तांच्या सहकार्यातून भविष्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. त्यासाठी तयारी सुरू असून येणाऱ्या काळात येथील ओसाड माळरानावर सर्वत्र हिरवळ दिसेल, असा विश्वास आहे. त्यासाठी सर्वांना सोबत घेवून काम करू.

-बळीराम गवते, विश्वस्त, नारायणगड.

## मातोश्री शासकीय ई.बी.सी. वसतीगृहात प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांने अर्ज करण्याचे आवाहन

**बीड,** दि. 31 :- मातोश्री शासकीय ई.बी.सी. वसतीगृह, (चांदमारी) बी अॅन्ड सी कॉर्टर, धानोरा रोड बीड या वसतीगृहात सन 2024-25 या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांनी दि. 26 जुलै ते 14 ऑगस्ट 2024 या कालावधीमध्ये शासकीय सुटया वगळता विहीत नमुन्यातील अर्ज अंतीम तारखेच्या आत योग्य कागदपत्रासह परिपूर्ण भरुन कार्यालयीन वेळेत सादर करावेत. या वसतीगृहात माध्यमिक विभाग , उच्च माध्यमिक विभाग, महाविद्यालय विभाग विद्यार्थ्यांसाठी आहे. मागील वर्षात वसतीगृहात प्रवेश असलेल्या विद्यार्थ्यांनी पुर्न प्रवेशासाठी शेकडा 60 टक्के गुण असणे आवश्यक आहे. आशा विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन मातोश्री शासकीय ई.बी.सी. वसतीगृहाचे गृहप्रमुख यांनी केले आहे.

त्रुटी असलेले अपूर्ण अर्ज व अंतीम तारखेनंतर आलेल्या अर्जाचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

## महसूल दिनानिमित्त महसूल पंधरवडा १ ऑगस्टपासून

**बीड :- (प्रतिनीधी )**
बीड, दि.31 : महसूल विभागातर्फे दरवर्षी 1 ऑगस्ट हा 'महसूल दिन' म्हणून साजरा करण्यात येतो यावर्षी एक ऑगस्ट पासून ते 15 ऑगस्ट पर्यंत महसूल पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे यापूर्वी महसूल सप्ताह साजरा होणार होता यात वाढ करून आता सप्ताह ऐवजी पंधरवडा साजरा होणार आहे.

गुरुवारी सकाळी 11 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल दिन साजरा होऊन महसूल पंधरवड्याचा शुभारंभ जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात होईल.

या निमित्ताने राज्य शासनाच्या विविध महत्वकांक्षी योजनांची माहिती नागरिकांमध्ये जनजागृती आणि नागरिकांचे काही प्रश्न असल्यास त्याचा निपटारा करण्यात येणार आहे. या अंतर्गत 01 ऑगस्ट रोजी "मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना" 2 ऑगस्ट रोजी "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण" योजना 3 ऑगस्ट रोजी "मुख्यमंत्री तीर्थ दर्शन" योजना 4 ऑगस्ट रोजी "स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय" 5 ऑगस्ट रोजी "कृषी मार्गदर्शन" कार्यक्रम 6 ऑगस्ट रोजी "शेती पाऊस आणि दाखले" 7 ऑगस्ट रोजी "युवा संवाद" 8 ऑगस्ट रोजी "महसूल- जनसंवाद" 9 ऑगस्ट रोजी 'महसुली ई – प्रणाली' 10 ऑगस्ट रोजी "सैनिक हो तुमच्यासाठी" 11 ऑगस्ट रोजी "आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन" 12 ऑगस्ट रोजी "एक हात मदतीचा - दिव्यांगाच्या कल्याणाचा" 13 ऑगस्ट रोजी "महसूल अधिकारी कर्मचारी यांची प्रशिक्षण" 14 ऑगस्ट रोजी "महसूल पंधरवडा वार्तालाप" आणि दिनांक 15 ऑगस्ट रोजी महसूल संवर्गातील कार्यरत सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संवाद तसेच उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार वितरण व महसूल पंधरवडा सांगता समारंभ असा कार्यक्रम होऊन या महसूल पंधरवड्याचा समापन होणार आहे. 0000

## मनोज जरांगे यांच्या वाढदिवसानिमित्त आज पाटोद्यात रक्तदान शिबिर

**पाटोदा ।** मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवारी पाटोदा शहरात सकल मराठा समाज पाटोदा यांच्या वतीने महा रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. या रक्तदान शिबिरात शेकडो कार्यकर्ते रक्तदान करणार असल्याची माहिती समितीच्या वतीने देण्यात आली आहे. शहरांप्रमाणेच ग्रामीण भागात देखील अनेक गावांमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरामध्ये ३ ते ४ दिवसांपासून शेकडो युवकांनी रक्तदानासाठी नोंदणी केली आहे. १४० च्या वर युवक या शिबिरात रक्तदान करणार आहेत. शिबिराचा शुभारंभ विठ्ठल रुक्मिणी संस्थानचे सतीश महाराज उरणकर यांच्या हस्ते होणार आहे.

## छत्रपती संभाजीनगर येथील प्रकल्पासाठी टोयोटा किर्लोस्करसमवेत सामंजस्य करार

### राज्यातील मोटार निर्मिती उद्योगात क्रांती आणणारा प्रकल्प - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### मराठवाड्यात २० हजार कोटींची गुंतवणूक होणार

**मुंबई(प्रतिनिधी)**
मुंबई, दि. ३१ : छत्रपती संभाजीनगर येथे टोयोटा किर्लोस्करच्या प्रकल्पामुळे मराठवाड्याला मोठा फायदा तर होईलच शिवाय एकूणच भारतातील मोटार वाहन निर्मिती उद्योगात देखील एक क्रांती येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

आज सह्याद्री अतिथिगृह येथे राज्य शासनाचा उद्योग विभाग आणि टोयोटा किर्लोस्कर यांच्यात छत्रपती संभाजीनगर येथील ऑरिक सिटीमध्ये इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार्स निर्मितीच्या ग्रीनफिल्ड प्रकल्पासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते .

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, किर्लोस्कर मोटर्सच्या उपाध्यक्ष मानसी टाटा, गीतांजली किर्लोस्कर, टाटा किर्लोस्करचे व्यवस्थापकीय संचालक मसाकाझू योशीमुरा, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंह चहल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे. एमआयडीसी सीईओ विपिन शर्मा आदी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर येथे या प्रकल्पातून इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कारचे उत्पादन होणार आहे. यासाठी २० हजार कोटींची गुंतवणूक केली जाणार असून सुमारे ८ हजार थेट आणि अप्रत्यक्ष ८ हजार अशी १६ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. या प्रकल्पातून वर्षाला ४ लाख कारची निर्मिती होणे अपेक्षित आहे. या प्रकल्पासाठी ८५० एकर जागा देण्यात आली आहे.

ई-क्रांती येणार




टोयोटाच्या या प्रकल्पामुळे भारताच्या ई-कार्स निर्मिती उद्योगात क्रांती येईल, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, राज्य शासन देखील इलेक्ट्रिक वाहनांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देत असून सार्वजनिक वाहतूक यंत्रणेत देखील वाहनांचा वापर वाढवला आहे. गृहनिर्माण संस्थांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग केंद्र उभारण्यासाठी कायाद्यात आवश्यक ते बदल केले आहेत. राज्यात सर्वोत्तम दळणवळण, कुशल मनुष्यबळ, पायाभूत सुविधा आणि जागा उपलब्ध आहे. टोयोटाचे आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान आणि आमचे कुशल मनुष्यबळ याची चांगली सांगड होईल. राज्यात शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, गृहनिर्माण अशा सुविधा मुबलक उपलब्ध असून कोणत्याही उद्योगाच्या कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आनंदाने राहता येईल, असे वातावरण आहे. राज्य विदेशी गुंतवणुकीत अग्रेसर असून गेल्या दोन वर्षात दावोस येथे झालेल्या ६० दशलक्ष डॉलर्सच्या करारांची ८० टक्के अंमलबजावणी झाली आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

आपल्या भाषणाची सुरुवात मुख्यमंत्री श्री.शिंदे यानी जपानी भाषेत नमस्कार म्हणजे "कोनीचिवा" असे संबोधून केली, तर आभार देखील "एरिगेटो गोझामासू" अशा शब्दात मानले.

टोयोटा आल्याने अपूर्णता संपली - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

यावेळी या कराराचे वर्णन 'ऐतिहासिक' या शब्दात करून उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्यात अनेक ऑटोमोबाईल सेक्टर आहेत पण टोयोटा नसल्याने ते अपूर्ण होते. आता राज्यात टोयोटा असल्याने हे सेक्टर पूर्ण झाले आहे. मराठवाड्यातील चेंबर ऑफ कॉमर्स समूह या उद्योगासाठी शासनाच्या वतीने सर्वोतोपरी सहकार्य करेल. या गुंतवणुकीमुळे मराठवाड्यात रोजगार निर्मिती तर होणारच आहे पण आर्थिक प्रगतीही साध्य होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आम्ही राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर करण्याकडे वाटचाल सुरु केली आहे. हा करार अर्थव्यवस्था वाढीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यास महत्वपूर्ण ठरणार आहे. राज्यात जेएनपीटीसारखे बंदर आहे आणि त्याच्या तीनपट मोठे वाढवणं बंदर होणार आहे. हे देशातील सर्वात मोठे बंदर ठरणार आहे. तसेच जालनामध्ये ड्राय पोर्ट होणार आहे. निर्यातीसाठी उत्तम असल्याने मराठवाड्यात गुंतवणूक म्हणजे निर्यातीच्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत असेही उपमुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी मसाकाझु योशीमुरा यांनी देखील आपल्या मनोगतात महाराष्ट्राची निवड या प्रकल्पासाठी करण्यामागची करणे सांगितली. भारत आणि महाराष्ट्राच्या समग्र विकासात टोयोटा देखील एक भागीदार बनू इच्छिते. देशाशी गेल्या अडीच दशकापासून आमचे संबंध असून ते या प्रकल्पाच्या अजून वाढीस लागतील असेही म्हणाले. मानसी टाटा यांनी देखील यावेळी राज्य शासनाचे या प्रकल्पासाठी सहकार्य मिळाल्याबद्धल आभार मानले. प्रारंभी प्रधान सचिव डॉ. कांबळे यांनी या प्रक्ल्पामागची भूमिका स्पष्ट केली. उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे यांनी सूत्रसंचालन केले.

## जिल्ह्यात १० ऑगस्ट रोजी रात्री २४ वाजेपर्यंत मनाई आदेश

**बीड,** दि. 31 :- मराठा ओबीसी,धनगर व इतर समाजाचे विविध उपोषण,आंदोलने,सभा सद्या सुरु असून जिल्हयात राजकीय हालचाली व घडामोडीमुळे मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने, रास्ता रोको या सारखे आंदोलने होण्याची शक्यता नाकारता येत नाही. किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होऊन जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेची शक्यता नाकारता येत नाही.तसेच आगामी कालावधीत मराठा,ओबीसी, धनगर आरक्षण मागणीसाठी सर्व समाज अक्रमक आहेत. कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. हा मनाई आदेश 10 ऑगस्ट 2024 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा 37 (1) (3) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम 37 (1) (3 ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही.

कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय 15 दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077